# कार्यकारी सारांश

# मध्यावधी पुनरावलोकन (एमटीआर) याचिका

# टाटा पॉवर -पारेषण

# प्रकरण क्र. २०२२ चा २१७

Lighting up Lives!

# कार्यकारी सारांश

## १.१ टाटा पॉवर- पारेषण ऐतिहासिक दृष्टीकोन:

१. टाटा पॉवर कंपनी लिमिटेड ("टाटा पॉवर") ही कंपनी १९१९ साली स्थापन झालेली आहे. १ एप्रिल २००० रोजी टाटा हायड्रो- इलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कंपनी लिमिटेड (१९१० मध्ये स्थापन झालेली) आणि आंध्र व्हॅली पॉवर सप्लाय कंपनी लिमिटेड (१९१६ साली स्थापन झालेली) या दोन्ही कंपन्यांचे टाटा पॉवरमध्ये विलिनीकरण करून एक एकात्मिक कंपनी स्थापन करण्यात आली. या विलिनीकरणानंतर उक्तनिर्देशित कंपन्यांच्या परवान्यांचेही विलिनीकरण करण्यात आले आणि टाटा पॉवरला महाराष्ट्र शासनाकडून त्यांच्या मुंबई परवाना क्षेत्रातील जनतेला वीजपुरवठा करण्यासाठी आणि वीज वितरण परवानाधारकांना मोठ्या प्रमाणावर वीजपुरवठा करण्यासाठी ठराव क्र. आयईए-२००१/ सीआर- १०५०९/ एनआरजी-१ दिनांक १२ जुलै २००१ रोजी परवानगी देण्यात आली.

२. उक्तनिर्देशित परवाने १५ ऑगस्ट २०१४ पर्यंत वैध होते. त्यानंतर टाटा पॉवरच्या पारेषण उद्योगाकडून (टाटा पॉवर- टी) प्रकरण क्रमांक २०१४ चा ११२ मध्ये पारेषण परवाना प्रदान करण्यासाठी अर्ज दाखल करण्यात आला. माननीय आयोगाने १४ ऑगस्ट २०१४ रोजी टाटा पॉवरला मुंबई क्षेत्रात आणि बाहेरील परिसरात टाटा पॉवरच्या मालकीच्या किंवा भविष्यात टाटा पॉवरकडून बांधल्या जाणाऱ्या आणि मालकी घेण्यासाठी प्रस्तावित असलेल्या आणि महाराष्ट्राच्या आंतर राज्य पारेषण यंत्रणेचा भाग असलेल्या पारेषण वाहिन्या आणि रिसिव्हिंग केंद्रांना (किंवा पारेषण रिसिव्हिंग केंद्रे) १६ ऑगस्ट २०१४ पासून २५ वर्षांच्या कालावधीसाठी पारेषण परवान्याची मान्यता दिली होती.

३. मा. आयोगाने टाटा पॉवर-टीच्या पारेषण परवाना क्र. २०१४ चा १ मध्ये त्यांच्या प्रकरण क्र. २०१६ चा १३७ मधील १ ऑगस्ट २०१८ रोजीच्या आदेशान्वये बदल (पहिला बदल) केला होता.

४. त्यानंतर, मा. आयोगाने टाटा पॉवर-टीच्या पारेषण परवाना क्र. २०१४ चा १ मध्ये प्रकरण क्र. २०१९ चा २४९ मधील ११ मार्च २०२१ रोजीच्या आदेशान्वये बदल (दुसरा बदल) केला आहे.

## १.२ टाटा पॉवर पारेषण नेटवर्क आणि ग्रिड उपलब्धता

५. टाटा पॉवर-टीच्या पारेषण वाहिन्यांची व्याप्ती आणि प्रसार यांचा व्यापक सारांश खालीलप्रमामे आहेः

**तक्ता १: टाटा पॉवर-टी पारेषण प्रणाली**

| निकष | आर्थिक वर्ष २०१९-२०* (प्रत्यक्ष) | आर्थिक वर्ष २०२०-२१* (प्रत्यक्ष) | आर्थिक वर्ष २०२१-२२* (प्रत्यक्ष) | आर्थिक वर्ष २०२२-२३ (अंदाजित) | आर्थिक वर्ष २०२३-२४ (सुधारित) | आर्थिक वर्ष २०२४-२५ (सुधारित) |
|---|---|---|---|---|---|---|
| **पारेषण वाहिन्यांची लांबी (सर्किट किमी.)** | **१२१८** | **१२३६** | **१२४१** | **१२५९** | **१२६५** | **१२६९** |
| **उपसाधन सचांची एकूण संख्या (संख्या)** | **१४५८** | **१५१७** | **१५४०** | **१५४८** | **१५९७** | **१६२६** |
| >६६ केव्ही आणि <४०० केव्ही | ४२६ | ४६० | ४६६ | ४७३ | ५१३ | ५२० |
| ६६ केव्ही आणि कमी | १०३२ | १०५७ | १०७४ | १०७५ | १०८४ | ११०६ |

* टाटा पॉवर-टीच्या पारेषण परवाना बदल अर्जाप्रमाने

६. **पारेषण वाहिनी उपलब्धता -** टाटा पॉवर-टी मागील अनेक वर्षांपासून ९९.४५ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त ग्रिडची उपलब्धता साध्य करत आहे. उच्च ग्रिड उपलब्धतेमुळे पारेषण यंत्रणा वापरकर्ते (टीएसयू) ना आणि परिणामात्मक मुंबई परवाना क्षेत्रातील अंतिम ग्राहकांना वीजपुरवठ्यातील विश्वासार्हता वाढते. टाटा पॉवर-टीमधील ग्रिडची उपलब्धता टीएसयूसोबत समन्वय साधून नियोजनबद्ध पद्धतीने, वीजपुरवठा खंडित होणे आणि वारंवार खंडित होणे टाळण्यासाठी, उपसाधन संच आणि साधनांच्या प्रभावी प्रतिबंधात्मक देखभाल करून साध्य केली जाते.

**तक्ता २: टाटा पॉवर-टी पारेषण यंत्रणा उपलब्धता**

| आर्थिक वर्ष | टाटा पॉवर-टी यंत्रणा उपलब्धता (टक्के) |
|---|---|
| आर्थिक वर्ष २०१७-१८ | ९९.४८ |
| आर्थिक वर्ष २०१८-१९ | ९९.५० |
| आर्थिक वर्ष २०१९-२० | ९९.७५ |
| आर्थिक वर्ष २०२०-२१ | ९९.८९ |
| आर्थिक वर्ष २०२१-२२ | ९९.८७ |

### १.३ दाखल केलेल्या एमटीआर याचिकेअंतर्गत सादरीकरणे

७. टाटा पॉवर-टीने प्रस्तुत याचिकेत खाली दिल्याप्रमाणे खालील बाबी सादर केल्या आहेतः

- एमईआरसी (बहुवर्षीय वीजदर) विनियम २०१५ नुसार आर्थिक वर्ष २०१९-२० साठी अचूक समायोजन
- एमईआरसी (बहुवर्षीय वीजदर) विनियम २०१९ नुसार आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी अचूक समायोजन
- एमईआरसी (बहुवर्षीय वीजदर) विनियम २०१९ नुसार आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी तात्पुरते अचूक समायोजन
- आर्थिक वर्ष २०२१-२२ च्या शेवटी तफावत / (अतिरिक्त)
- एमईआरसी (बहुवर्षीय वीजदर) विनियम २०१९ नुसार आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी वार्षिक महसूल आवश्यकतेचा सुधारित अंदाज.
- निर्देशांच्या पालनाची स्थिती
- मागील वसूलीसह वार्षिक महसूल आवश्यकता
- ४०० केव्ही विक्रोळी प्रकल्पातील शिल्लक दावे
- प्रकरण क्र. २०२० चा ९५ मध्ये पुनरावलोकन याचिकेवरील आदेशाचा परिणाम

## १.४ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण

८. टाटा पॉवर-टीसाठी आर्थिक वर्ष २०१९-२०, आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी प्रत्यक्ष भांडवली खर्च व भांडवल, आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी अंदाजित भांडवली खर्च व भांडवल आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी सुधारित भांडवली खर्च व भांडवल खालील तक्त्यात दर्शवल्याप्रमाणे आहे:

**तक्ता ३: भांडवली खर्च**

| वर्गवारी | भांडवली खर्च (कोटी रूपये) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | आर्थिक वर्ष २०१९-२० (प्रत्यक्ष) | आर्थिक वर्ष २०२०-२१ (प्रत्यक्ष) | आर्थिक वर्ष २०२१-२२ (प्रत्यक्ष) | आर्थिक वर्ष २०२२-२३ (अंदाजित) | आर्थिक वर्ष २०२३-२४ (सुधारित) | आर्थिक वर्ष २०२४-२५ (सुधारित) |
| डीपीआर | ५०९.०१ | ४२५.५४ | ५७१.६९ | ५२०.८७ | ७९०.२७ | ४८५.३४ |
| बिगर डीपीआर | २७.६१ | ३६.६१ | ६३.११ | ९०.८७ | ६.३० | २१.८२ |
| **एकूण** | **५३६.६२** | **४६२.१५** | **६३४.८०** | **६११.७४** | **७९६.५७** | **५०७.१६** |

**तक्ता ४: भांडवलीकरण**

| वर्गवारी | भांडवलीकरण (कोटी रूपये) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | आर्थिक वर्ष २०१९-२० (प्रत्यक्ष) | आर्थिक वर्ष २०२०-२१ (प्रत्यक्ष) | आर्थिक वर्ष २०२१-२२ (प्रत्यक्ष) | आर्थिक वर्ष २०२२-२३ (अंदाजित) | आर्थिक वर्ष २०२३-२४ (सुधारित) | आर्थिक वर्ष २०२४-२५ (सुधारित) |
| डीपीआर | ३६८.५४ | ६६२.२२ | ३६५.२९ | ७४७.४९ | ६७२.६१ | ६६०.३४ |
| बिगर डीपीआर | ३७.६३ | ३८.१२ | ५९.६६ | ९४.२० | ०.०० | १५.०० |
| **एकूण** | **४०६.१७** | **७००.३४** | **४२४.९५** | **८४१.६९** | **६७२.६१** | **६७५.३४** |

९. आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ या कालावधीसाठी भांडवली खर्च व भांडवलीकरण खालील प्रमुख वर्गवारींमध्ये अंमलबजावणी करण्यात येणा-या प्रकल्पांच्या आधारावर आहेत:

अ. नवीन ईएचव्ही उपकेंद्रांची स्थापना

आ. पॉवर ट्रान्सफॉर्मर्सची स्थापना

इ. आंतरजोडण्या, यंत्रणाच्या अबाधीत संचालनासाठी रिएक्टर्सची स्थापना

ई. जुन्या झालेल्या ऑईल फिल ईएचव्ही केबलच्या जागी एक्सएलपीई केबल्स लावणे.

उ. कार्यान्वयनाच्या विश्वासार्हतेसाठी एआयएसपासून जीआयएसमध्ये रूपांतर.

## १.५ आर्थिक वर्ष २०१९-२० साठी अचूक समायोजन

१०. टाटा पॉवर-टीसाठी आर्थिक वर्ष २०१९-२० साठी खर्चाचे वर्गीकरण नफा आणि तोट्याच्या वाटपामुळे होणाऱ्या समायोजनासह खालीलप्रमाणे दर्शवण्यात आले आहे:

**तक्ता ५: आर्थिक वर्ष २०१९-२० साठी निव्वळ वार्षिक पारेषण शुल्क आणि तफावत**

रूपये कोटी

| अनु क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०१९-२० साठी मान्यताप्राप्त आकडेवारी | नियमावलीनुसार पात्रता | ग्राहकांसोबत वाटण्यात आलेल्या नियंत्रणयोग्य घटकांपासून कार्यक्षमता लाभ / (नुकसान) | नियंत्रित न होणारे घटक | नियंत्रण होणाऱ्या घटकांपासून लाभ / (नुकसान) यांच्या प्रभावानंतर हक्क |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| I | **महसूल** | | | | | |
| | -पारेषण शुल्क | **७०३.२०** | **७०३.७२** | | | **७०३.७२** |
| | - वजा रोखसवलत | | -०.६६ | | | -०.६६ |
| | - अधिक दरेतर उत्पन्न | १२.८९ | १४.९८ | | | १४.९८ |
| II | **एकूण महसूल** | **७१६.०९** | **७१८.०४** | | | **७१८.०४** |
| | | | | | | |
| II | **खर्च** | | | | | |
| १ | कार्यान्वयन आणि देखभाल खर्च | २१६.०९ | २२१.४६ | -१.०३ | १०.५३ | २३३.०३ |

रूपये कोटी

| अनु क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०१९-२० साठी मान्यताप्राप्त आकडेवारी | नियमावलीनुसार पात्रता | ग्राहकांसोबत वाटण्यात आलेल्या नियंत्रणयोग्य घटकांपासून कार्यक्षमता लाभ / (नुकसान) | नियंत्रित न होणारे घटक | नियंत्रण होणाऱ्या घटकांपासून लाभ / (नुकसान) यांच्या प्रभावानंतर हक्क |
|---|---|---|---|---|---|---|
| १.१ | ईएचव्ही सहाय्यभूत वापरासाठी वीजशुल्क | १४.०३ | १२.१३ | | | १२.१३ |
| २ | घसारा | १५५.५२ | १५०.०३ | | | १५०.०३ |
| ३ | दीर्घकालीन कर्जभांडवलावर व्याज | १०९.६४ | ९८.५७ | | | ९८.५७ |
| ४ | खेळत्या भांडवलावरील व्याज | १३.५८ | १४.०१ | ३.४६ | | १०.५५ |
| ५ | पुनर्वित्तपुरवठा आणि इतर आर्थिक शुल्क | ०.०० | ३.२२ | | | ३.२२ |
| ६ | प्रोत्साहन | ०.०० | ५.५८ | | | ५.५८ |

रूपये कोटी

| अनु क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०१९-२० साठी मान्यताप्राप्त आकडेवारी | नियमावलीनुसार पात्रता | ग्राहकांसोबत वाटण्यात आलेल्या नियंत्रणयोग्य घटकांपासून कार्यक्षमता लाभ / (नुकसान) | नियंत्रित न होणारे घटक | नियंत्रण होणाऱ्या घटकांपासून लाभ / (नुकसान) यांच्या प्रभावानंतर हक्क |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | आपत्कालीन साठा | ९.०८ | ९.१५ | | | ९.१५ |
| ८ | प्राप्तीकर | ३३.४० | ३६.३४ | | | ३६.३४ |
| ९ | भागभांडवलावरील परतावा | १९७.७१ | १९३.६२ | | | १९३.६२ |
| **II** | **एकूण खर्च** | **७४९.०६** | **७४४.११** | | | **७५२.२१** |
| | | | | | | |
| **III** | **आर्थिक वर्ष २०१९-२० साठी निव्वळ तफावत/ (अतिरिक्त) (II - I)** | **३२.९५** | | | | **३४.१७** |

११. उक्तनिर्देशित तक्त्यातून दिसून येते की आर्थिक वर्ष २०१९-२० साठीची तफावत **३४.१७ कोटी रूपये** आहे जी आर्थिक वर्ष २०१९-२० दरम्यान कमावलेला महसूल आणि फक्त २०१९-२० या वर्षातील खर्चामधील तफावतीच्या स्वरूपात मोजण्यात आली आहे.

### १.६ आर्थिक वर्ष २०२०-२१ साठी अचूक समायोजन

१२. टाटा पॉवर-टीसाठी आर्थिक वर्ष २०२०-२१ साठी खर्चाची वर्गवारी नफा आणि तोट्याच्या देवाणघेवाणीतील समायोजनासह खालीलप्रमाणे देण्यात आली आहे:

**तक्ता ६: आर्थिक वर्ष २०२०-२१ साठी निव्वळ वार्षिक पारेषण शुल्क आणि तफावत**

रूपये कोटी

| अनु क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०२०-२१ साठी मान्यताप्राप्त आकडेवारी | नियमावलीनुसार पात्रता | ग्राहकांसोबत वाटण्यात आलेल्या नियंत्रणयोग्य घटकांपासून कार्यक्षमता लाभ / (नुकसान) | नियंत्रित न होणारे घटक | नियंत्रण होणाऱ्या घटकांपासून लाभ / (नुकसान) यांच्या प्रभावानंतर हक्क |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| I | **महसूल** | | | | | |
| | -पारेषण शुल्क | ६३६.६० | ६३६.६० | | | ६३७.१२ |
| | - वजा रोखसवलत | | -०.८५ | | | -०.८५ |
| | - दरेतर उत्पन्न | १३.५८ | १०.३० | | | २३.८८ |
| I | **एकूण महसूल** | **६५०.१८** | **६४६.०५** | | | **६६०.१५** |
| | | | | | | |
| II | **खर्च** | | | | | |
| १ | कार्यान्वयन आणि देखभाल खर्च | १७१.९४ | १७७.३१ | -२२.८८ | ०.०० | २००.१९ |

रूपये कोटी

| अनु क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०२०-२१ साठी मान्यताप्राप्त आकडेवारी | नियमावलीनुसार पात्रता | ग्राहकांसोबत वाटण्यात आलेल्या नियंत्रणयोग्य घटकांपासून कार्यक्षमता लाभ / (नुकसान) | नियंत्रित न होणारे घटक | नियंत्रण होणाऱ्या घटकांपासून लाभ / (नुकसान) यांच्या प्रभावानंतर हक्क |
|---|---|---|---|---|---|---|
| १.१ | ईएचव्ही सहाय्यभूत वापरासाठी वीजशुल्क | १४.०२ | ७.८४ | | | ७.८४ |
| २ | घसारा | १७६.४६ | १७९.८७ | | | १७९.८७ |
| ३ | दीर्घकालीन कर्जभांडवलावरील व्याज | १२८.०५ | १०८.७० | | | १०८.७० |
| ४ | खेळत्या भांडवलावरील व्याज | १३.१४ | ११.६१ | १.५३ | | १०.०९ |
| ५ | इतर आर्थिक शुल्क | ०.०० | ०.१५ | | | ०.१५ |
| ६ | आपत्कालीन साठा | १०.६४ | १०.१३ | | | १०.१३ |
| ७ | भागभांडवलावरील परतावा | २४३.४३ | २६४.८५ | | | २६४.८५ |
| **II** | **एकूण खर्च** | **७५७.६८** | **७६०.४७** | | | **७८१.८२** |
| | | | | | | |
| **III** | **आर्थिक वर्ष २०२०-२१ साठी निव्वळ तफावत / (अतिरिक्त) (II - I)** | | | | | **१२१.६७** |

१३. उक्तनिर्देशित तक्त्यातून दिसून येते की आर्थिक वर्ष २०२०-२१ साठीची तफावत **१२१.६७ कोटी** रूपये आहे, जी आर्थिक वर्ष २०२०-२१ दरम्यान कमावलेला महसूल आणि फक्त २०२०-२१ या वर्षातील खर्चामधील तफावतीच्या स्वरूपात मोजण्यात आली आहे.

## १.७ आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी अचूक समायोजन

१४. टाटा पॉवरचे बहुवार्षिक वीजदर आदेश जारी केल्यानंतर माननीय आयोगाने टाटा पॉवर-टीच्या पारेषण परवाना दुसऱ्या दुरूस्तीसाठीच्या अर्जावर प्रकरण क्र. २०१९ चा २४९ मध्ये ११ मार्च २०२१ रोजीचे आदेश जारी करताना टाटा पॉवरच्या निर्मिती आणि वितरण उद्योगातील विशिष्ट घटकांचे हस्तांतरण टाटा पॉवरच्या पारेषण उद्योगाला करण्याची मान्यता दिली आहे.

१५. उक्तनिर्देशित बाबींच्या दृष्टीकोनातून टाटा पॉवर-टीने आपल्या निर्मिती आणि वितरण उद्योगातील मालमत्तांच्या हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण केली आहे. टाटा पॉवर-टीला हस्तांतरित केलेल्या एकूण स्थावर मालमत्तामध्ये ४७.०८ कोटी रूपये आणि ५.३७ कोटी रूपयांच्या एकूण स्थावर मालमत्ताच्या अनुक्रमे टाटा पॉवर-जी आणि टाटा पॉवर-डीकडून हस्तांरणाचा समावेश आहे.

१६. परिणामी, एकूण स्थावर मालमत्ता, नियामक समभाग (Regulatory equity) आणि कर्ज यांची आर्थिक वर्ष २०२०-२१ साठीची वरील भाग दर्शवलेली अंतिम पातळी बदलून सुधारित एकूण स्थावर मालमत्ता नियामक समभाग आणि कर्ज यांची आर्थिक वर्ष २०२१२२ साठीची प्रारंभीक पातळी खालील तक्त्यात दर्शवल्याप्रमाणे आहे:

**तक्ता ७: आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी सुधारित प्रारंभीचा एकूण स्थावर मालमत्ता, समभाग आणि कर्ज**

रूपये कोटी

| तपशील | आर्थिक वर्ष २०२०-२१ ची शिल्लक | हस्तांतरणामुळे वाढ | आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी सुधारित प्रारंभ |
|---|---|---|---|
| एकूण स्थावर मालमत्ता | ४७२६.०८ | ५२.४६ | ४७७८.५४ |
| नियामक समभाग | १५०९.९० | १५.७४ | १५२५.६४ |
| कर्ज | १५४८.०८ | १५.३२ | १५६३.४० |

१७. टाटा पॉवर-टीने आर्थिक वर्ष २०२१-२२ साठीच्या अचूक समायोजनाच्या गणनासाठी उक्तनिर्देशित परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे सुधारित प्रारंभीचा एकूण स्थावर मालमत्ता, भागभांडवल आणि कर्ज विचारात घेतले आहेत.

१८. त्यानुसार टाटा पॉवर-टीसाठी आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी खर्चाचे वर्गीकरण आणि नफा आणि नुकसानाच्या वाटपामुळे समायोजनासह खालीलप्रमाणे आहेत:

**तक्ता ८: आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी निव्वळ वार्षिक पारेषण शुल्क आणि तफावत**

रूपये कोटी

| अनु क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी मान्यताप्राप्त आकडेवारी | विनियमांनुसार मालकी | ग्राहकांसोबत वाटण्यात आलेल्या नियंत्रणातील घटकांमधून कार्यक्षमता लाभ / (तोटा) | अनियंत्रित घटक | नियंत्रणयोग्य घटकांपासून झालेले लाभ / (तोट्याच्या) प्रभावानंतर निव्वळ मालकी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| **I** | **महसूल** | | | | | |
| | -पारेषण शुल्क | ७८२.४८ | | | | ७८२.५२ |
| | -वजा रोख सवलत | ०.०० | | | | ०.९४ |
| | - दरेतर उत्पन्न | १४.३८ | | | | ३०.०८ |
| **II** | **एकूण महसूल** | **७९६.८६** | | | | **८११.६६** |
| | | | | | | |
| **II** | **खर्च** | | | | | |
| १ | कार्यान्वयन आणि देखभाल खर्च | १७८.८८ | २०२.७८ | -१८.१५ | ५६.६६ | २७७.५९ |
| १.१ | ईएचव्ही सहाय्यभूत वापरासाठी ऊर्जा शुल्क | १४.०२ | १३.४७ | | | १३.४७ |
| २ | घसारा | १८८.१२ | २०२.८५ | | | २०२.८५ |
| ३ | दीर्घकालीन कर्ज भांडवलावर व्याज | १३०.२५ | ११९.६३ | | | ११९.६३ |

| अनु क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी मान्यताप्राप्त आकडेवारी | विनियमांनुसार मालकी | ग्राहकांसोबत वाटण्यात आलेल्या नियंत्रणातील घटकांमधून कार्यक्षमता लाभ / (तोटा) | अनियंत्रित घटक | नियंत्रणयोग्य घटकांपासून झालेले लाभ / (तोट्याच्या) प्रभावानंतर निव्वळ मालकी |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | खेळत्या भांडवलावरील व्याज | १५.३६ | १४.२१ | १.९६ | | १२.२५ |
| ५ | इतर आर्थिक शुल्क | ०.०० | ०.१६ | | | ०.१६ |
| ६ | आपत्कालीन साठा | ११.७४ | ११.९५ | | | ११.९५ |
| ८ | भागभांडवलावरील परतावा | २५८.४७ | २९७.३१ | | | २९७.३१ |
| **II** | **एकूण खर्च** | **७९६.८६** | **८६२.३५** | | | **९३५.२०** |
| **III** | **आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी निव्वळ तफावत / (अतिरिक्त) (II - I)** | **०.००** | | | | **१२३.५४** |

१९. उक्तनिर्देशित तक्त्यातून दिसते त्याप्रमाणे आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी **१२३.५४ कोटी** रूपयांची तफावत आहे जी आर्थिक वर्ष २०२१-२२ दरम्यान मिळालेला महसूल आणि फक्त आर्थिक वर्ष २०२१-२२ मधील खर्चाच्या तफावतीच्या स्वरूपात दर्शवण्यात आली आहे.

## १.८ आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी तात्पुरते अचूक समायोजन

२०. आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी तात्पुरती तफावत / (अतिरिक्त) खाली दिल्याप्रमाणे बहुवर्षीय वीजदर विनिमय, २०१९ नुसार काढण्यात आली आहे:

**तक्ता ९: आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी निव्वळ वार्षिक पारेषण शुल्क आणि तफावत**

रूपये कोटी

| अनु क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी मान्यताप्राप्त आकडेवारी | नियंत्रणयोग्य घटकांपासून झालेले लाभ / (तोट्याच्या) प्रभावानंतर निव्वळ मालकी |
|---|---|---|---|
| | | | |
| I | **महसूल** | | |
| | -पारेषण शुल्क | ८१६.२१ | ८१६.२४ |
| | - वजा रोख सवलत | ०.०० | ०.०० |
| | - दरेतर उत्पन्न | १५.२१ | ३०.०८ |
| **II** | **एकूण महसूल** | **८३१.४२** | **८४६.३२** |
| | | | |
| **II** | **खर्च** | | |
| १ | कार्यान्वयन आणि देखभाल खर्च | १८४.४४ | २११.२८ |
| १.१ | ईएचव्ही सहाय्यभूत वापरासाठी ऊर्जा शुल्क | १४.०२ | १२.३१ |
| २ | घसारा | १९९.८२ | २२५.८७ |
| ३ | दीर्घकालीन कर्ज भांडवलावर व्याज | १३१.४८ | १३६.६२ |
| ४ | खेळत्या भांडवलावरील व्याज | १५.९५ | १६.२७ |

| अनु क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी मान्यताप्राप्त आकडेवारी | नियंत्रणयोग्य घटकांपासून झालेले लाभ / (तोट्याच्या) प्रभावानंतर निव्वळ मालकी |
|---|---|---|---|
| ५ | इतर आर्थिक शुल्क | ०.०० | ०.०० |
| ६ | आपत्कालीन साठा | १२.१२ | १२.८८ |
| ८ | भागभांडवलावरील परतावा | २७३.५८ | २९९.१४ |
| **II** | **एकूण खर्च** | **८३१.४२** | **९१४.३८** |
| **III** | **आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी निव्वळ तफावत / (अतिरिक्त) (II-I)** | | **६८.०६** |

२१. उक्तनिर्देशित तक्त्यातून दिसते त्याप्रमाणे **६८.०६ कोटी** रूपयांची तफावत आहे जी आर्थिक वर्ष २०२२-२३ दरम्यान अंदाजित महसूल आणि फक्त आर्थिक वर्ष २०२२-२३ मधील अंदाजित खर्चाच्या तफावतीच्या स्वरूपात दर्शवण्यात आली आहे.

### १.९ मागील वसुलींसह एकूण महसूल

२२. आर्थिक वर्ष २०१९-२० साठी ३२.९८ कोटी रूपयांची तात्पुरती तफावत माननीय आयोगाने आर्थिक वर्ष २०२०-२१ मधील वसुलीसाठी विचारात घेतली होती. तथापि वसुलीमध्ये पुढे नेण्याचा खर्च अनुज्ञेय करण्यात आला नव्हता. त्यानुसार प्रत्यक्ष आणि तात्पुरत्या अचूक समायोजनातील फरक आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये वसुली करण्यात येणाऱ्या एकूण महसूलचा भाग म्हणून वसूल करणे/ पुढे पाठवणे आवश्यक आहे. त्यामुळे आर्थिक वर्ष २०१९-२०, आर्थिक वर्ष २०२०-२१, आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी प्रत्यक्ष तफावत / (अतिरिक्त), आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी तात्पुरती तफावत / (अतिरिक्त) विचारात घेता भविष्यातील दरांसाठी मागील वसुलींची एकूण रक्कम खाली सादर करण्यात आली आहे:

**तक्ता १०: भविष्यातील दरांसाठी मागील वसुलींची रक्कम**

रूपये कोटी

| तपशील | | आर्थिक वर्ष २०१९-२० | आर्थिक वर्ष २०२०-२१ | आर्थिक वर्ष २०२१-२२ | आर्थिक वर्ष २०२२-२३ | आर्थिक वर्ष २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|---|
| प्रारंभीची शिल्लक | अ | | ३४.१७ | १२२.८५ | २४६.४० | ३१४.४६ |
| वर्षादरम्यान तफावत /(अतिरिक्त) वाढ | ब | ३४.१७ | १२१.६७ | १२३.५४ | ६८.०६ | - |
| बहुवर्षीय वीजदर आदेश २०१९ च्या २९९ साठी आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये समायोजित करण्यात आलेली तात्पुरती महसुली तफावत /(अतिरिक्त) | क | - | ३२.९८ | - | - | - |
| मागील वसुलीवर व्याज | ड | | | | | ५६.९९ |
| शेवटची शिल्लक | इ=(अ +ब-क+ड) | ३४.१७ | १२२.८५ | २४६.४० | ३१४.४६ | ३७१.४४ |
| **आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये एकूण मागील वसुली** | **ई=(ड +इ)** | | | | | **३७१.४४** |

२३. व्याजाचे केलेले गणन खालील तक्त्यात दर्शवण्यात आले आहे:

**तक्ता ११: मागील आर्थिक वर्षाची वसूली पुढे नेण्याचा खर्च**

रूपये कोटी

| तपशील | | आर्थिक वर्ष २०१९-२० | आर्थिक वर्ष २०२०-२१ | आर्थिक वर्ष २०२१-२२ | आर्थिक वर्ष २०२२-२३ | आर्थिक वर्ष २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|---|
| **पुढे नेण्याचा खर्च दर** | अ | **९.६६%** | **८.५७ %** | **८.५० %** | **९.४५ %** | **९.४५ %** |
| प्रारंभीची शिल्लक | ब | - | २८.५८ | ११७.२७ | २४०.८१ | २४०.८१ |
| वर्षादरम्यान टाकलेली भर | क | ३४.१७ | ८८.६९ | १२३.५४ | - | (२४०.८१) |
| वजा प्रोत्साहन | ड | ५.५८ | - | - | - | - |
| अंतिम शिल्लक | इ=(ब+क-ड) | २८.५८ | ११७.२७ | २४०.८१ | २४०.८१ | - |
| सरासरी शिल्लक | ई= सरासरी (अ,इ) | १४.२९ | ७२.९३ | १७९.०४ | २४०.८१ | १२०.४१ |
| **पुढे नेण्याचा खर्च** | **प=अ*ई** | **१.३८** | **६.२५** | **१५.२२** | **२२.७६** | **११.३८** |
| **पुढे नेण्याचा एकूण खर्च #** | **फ** | | | | | **५६.९९** |

* एसबीआयचा १ वर्षासाठीचा एमसीएलआर रेट + १.५%

# आर्थिक वर्ष २०१९-२० ते आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये पुढे नेण्याचा एकूण खर्च

### १.१० ४०० केव्ही विक्रोळी प्रकल्प बंद - ताळेबंद क्लेम्स

२४. माननीय आयोगाने जारी केलेल्या निर्देशांनुसार, ४०० केव्ही विक्रोळी प्रकल्पाशी संबंधित पूर्व-विकास खर्चातील विचलनाशी संबंधित दावे या याचिकेत समाविष्ट केले आहेत.

अ. विक्रोळी येथे विद्यमान पारेषण वाहिन्यांच्या खाली १५९१.०३ चौरस मीटरच्या प्लॉटच्या ३५ वर्षांच्या भाड्यासाठी एकवेळ प्रीमियम रक्कम **(रु. २०.५० कोटी)**

ब. नेरुळ आणि वाशी दरम्यान विद्यमान पारेषण वाहिन्यांच्या खाली असलेल्या राइट ऑफ वे (RoW) चा वापर करण्यासाठी भरपाई **(रु. १३.४५ कोटी)**

क. विकासपूर्व खर्चाच्या भागावर १० टक्के वस्तू व सेवा कर घटक आणि आयडीसी **(रु. १०.३२ कोटी)**

ड. तीन करार अल्पावधीत बंद केल्यामुळे करावयाचा खर्च (दावे). **(रु. १०.०० कोटी).**

इ. विक्रोळी प्लॉट बी च्या भाडेकरारासाठी मुद्रांक शुल्क **(रु. ०.६२ कोटी)**

ई. दारावे वाशीसह ईएचव्ही पारेषण वाहिन्यांसाठी लीज डीड ऑफ राइट ऑफ वे (RoW) साठी मुद्रांक शुल्क **(रु. ०.४१ कोटी)**

प. सिडको खारघर भूखंडाचे जमीन हस्तांतरण शुल्क **(रु. ०.४२ कोटी)**

फ. जानेवारी'१९ ते मे'१९ या कालावधीतील गुंतवणुकीवर परतावा - **(रु. ७.७२ कोटी)**

### १.११ आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ पर्यंत सुधारित सरासरी महसूल आवश्यकता

२५. सादर केलेल्या याचिकेत देण्यात आलेल्या विविध घटांवरील अंदाजांनुसार आणि आधीच्या वर्षांसाठी मोजण्यात आलेल्या तफावत / (अतिरिक्त) बाबींचा विचार करता टाटा पॉवर-टीसाठी आर्थिक वर्ष २०२३-२४ ची एकूण महसूल आवश्यकता खाली दिल्याप्रमाणे आहे:

**तक्ता१२: आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी वार्षिक पारेषण शुल्क**

| अनु क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०२३-२४ | आर्थिक वर्ष २०२४-२५ |
|---|---|---|---|
| १ | कार्यान्वयन आणि देखभाल खर्च | २३५.३७ | २४८.७५ |
| २ | घसारा | २५६.५७ | २८३.८९ |

| अनु क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०२३-२४ | आर्थिक वर्ष २०२४-२५ |
|---|---|---|---|
| ३ | दीर्घकालीन कर्ज भांडवलावर व्याज | १५८.०७ | १७३.०४ |
| ४ | चालू भांडवलावर व्याज | २४.७६ | २१.०८ |
| ५ | आपत्कालीन साठ्यात योगदान | १४.९८ | १६.६६ |
| **अ** | **एकूण महसुली खर्च** | **६८९.७५** | **७४३.४३** |
| ६ | समभागांवर परतावा | ३३७.६८ | ३७१.९८ |
| **ब** | **एकूण सरासरी महसुली आवश्यकता** | **१०२७.४३** | **१११५.४१** |
| | **इनएसटीएस दराखेरीज महसूल** | | |
| ७ | दरेतर उत्पन्न | ३०.०८ | ३०.०८ |
| ८ | इतर उद्योगांतून उत्पन्न | ०.०० | ०.०० |
| **क** | **एकूण महसूल** | **३०.०८** | **३०.०८** |
| **ड** | **एकूण महसूल (ब-क)** | **९९७.३५** | **१०८५.३३** |
| **इ** | पडताळणी आदेशाचा प्रभाव | ४.७८ | |
| **ई** | प्रस्तुत याचिकेत स्थापित करण्यात आलेल्या मागील परवानगी न दिलेल्या भांडवलीकरणाचा प्रभाव | ७.८९ | |
| **प** | ४०० केव्ही विक्रोळी प्रकल्पासंबंधीचे शिल्लक दावे | ७८.२८ | |
| **फ** | मागील वसुली | ३७१.४४ | |
| **ग** | **निव्वळ एकूण महसुली आवश्यकता (ड+इ+ई+प+फ)** | **१४५९.७५** | **१०८५.३३** |

## १.१२ माननीय आयोगाला विनंती

उक्तनिर्देशित बाबींचा विचार करून याचिकाकर्ते माननीय आयोगाकडे विनंती करतात की:

- प्रस्तुत याचिकेत बहुवर्षीय वीजदर विनियम २०१५ आणि त्याची पहिली दुरूस्ती २९ नोव्हेंबर २०१७ मधील मार्गदर्शक तत्वे आणि तत्वांनुसार मोजण्यात आलेले आर्थिक वर्ष २०१९-२० साठीचे अचूक समायोजन मान्य करण्यात यावे**;**
- बहुवर्षीय वीजदर विनियम २०१९ मध्ये नमूद केलेल मार्गदर्शक तत्वे आणि तत्वांनुसार प्रस्तुत याचिकेत गणन करण्यात आलेले आर्थिक वर्ष २०२०-२१, आर्थिक वर्ष २०२१-२२साठी अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी तात्पुरते अचूक समायोजन आणि मागील तफावत/ (अतिरिक्त) यांना मान्यता द्यावी;
- बहुवर्षीय वीजदर विनियम २०१९ मध्ये नमूद केलेल मार्गदर्शक तत्वे आणि तत्वांनुसार प्रस्तुत याचिकेत गणन करण्यात आलेले आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठीचे सुधारित अंदाज मान्यताप्राप्त करण्यात यावेत;
- खालील कारणांमुळे प्रस्तुत याचिकेत गणन करण्यात आलेली मागील वसुली मान्य करण्यात यावी
  - विक्रोळी प्रकल्पासंबंधीचे शिल्लक दावे;
  - प्रकरण  क्रमांक २०२० चा ९५ मधील १७ जून २०२० चे पुनर्विलोकन आदेश;
  - मागील दर आदेशांमध्ये मान्यता न दिलेले परंतु प्रस्तुत याचिकेत पुनर्स्थापित केलेले भांडवलीकरण;
- कोणत्याही बाबी चुकीने वगळण्यात आल्यास/ झालेल्या चुका/ समायोजनातील फरक/ त्रुटी क्षमापित कराव्यात आणि टाटा पॉवर-टीला प्रस्तुत सादरीकरणानंतर भर टाकण्याची/

बदलण्याची/ सुधारण्याची/ फेरबदल करण्याची अनुमती द्यावी आणि पुढील तारखेला आवश्यकतेनुसार आणखी बाबी समाविष्ट करण्याची अनुमती द्यावी;

- माननीय आयोगाला प्रकरणाची तथ्ये आण परिस्थिती यांचा विचार करून योग्य आणि आवश्यक वाटतील असे इतर पुढील आणि कोणतेही आदेश पारित करणे.

-स्वाक्षरी-

(स्वाती मेहेंदळे)

मुख्य नियामक

टाटा पॉवर कंपनी लिमिटेड